विद्यावर्धिनी संचालित,
**अण्णासाहेब वर्तक मानव्य, केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व इ. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्यालय**
वसई रोड (प.), जि. पालघर – ४०१२०२ (मुंबई विद्यापीठाशी संलग्न)


मराठी विभाग
आणि
**भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई**
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

Indian Council of Social Science Research

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता

International Peer reviewed Research Journal





## ।। संत साहित्याची समकालीनता ।।

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

समन्वयक
डॉ. शत्रुघ्न फड
(मराठी विभाग प्रमुख)
९४२२६७०५३०

सहसमन्वयक
डॉ. सखाराम डाखोरे
(सहाय्यक प्राध्यापक)
९८५०११६६४५

प्रा. शैलेश औटी
(सहाय्यक प्राध्यापक)
९८३३४८७४६८

निमंत्रक
डॉ. अरविंद उबाळे
(प्राचार्य)

Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**Special Issue-01**
**Dec. 2022**

**विद्यावर्धिनी शिक्षणसंस्था वसई**
आणि
**भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR),**
**पश्चिम विभागिय केंद्र, मुंबई**
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र
**'संत साहित्याची समकालीनता'**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

39) संस्कृत भाषा : मराठी संत साहित्याचा आधार
डॉ.संजीवनी श्रीपाद नेरकर, देगलूर ||171

40) संत चोखामेळा यांच्या अभंगातील विद्रोह
डॉ. सखाराम डाखोरे, जि. पालघर ||173

41) समाज प्रबोधनकार संत एकनाथ
सहा.प्रा.जगदीश अनंत संसारे, विरार (प) ||177

42) संत गाडगे महाराज यांचा मानवतावादी दृष्टिकोनाचा आढावा
डॉ.सचिन कांतीलाल पिसे, वसई रोड पश्चिम ||181

43) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व आदर्शग्रामराज्य
बांगर नितीनकुमार बाबासाहेब, जि.पालघर ||183

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Special Issue-01
Dec.2022

0173

मराठी भाषेमध्ये संस्कृत भाषेचा, त्यातील शब्दांचा वापर हा अत्यंत प्रचूरपणे परंतु अगदी सहजतेने होत होता.

" माझा मराठाचि बोलू कौतुके ।
परि अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मिळवीण ।। "
१४, ज्ञानेश्वरी अ.६

या ओळीमधून मराठी भाषेच मराठीपण हे संस्कृत भाषेच्या ममतेविना खरे अपुरेच आहे.अत एव, संतसाहित्य आणि संस्कृतभाषा यांचा आत्यन्तिक निकटवर्ती साहचर्य भाव लक्षात घेता, संतसाहित्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी संस्कृत भाषेचे अध्ययनाची आवश्यकता ही नाकारता येणार नाही,हे नक्की.

**संदर्भ :–**

१. संत सुभाषित कोष....संपा. रा.श.नगरकर डायमंड बुक्स प्रकाशन

२. श्री सुभाषित रत्न भांडारम भारतीय विद्या संस्थान

❑❑❑

40

# संत चोखामेळा यांच्या अभंगातील विद्रोह

**डॉ. सखाराम डाखोरे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई जि. पालघर

**********

**प्रस्तावना:** आजचा भारत हा खंडप्राय व विविध संप्रदायांनी युक्त देश आहे. जात, धर्म, पंथांच्या परंपरांमुळे नेहमीच चर्चेत राहणाऱ्या इथल्या अनेक समुदायांनी आपापल्या प्रथा–परंपरा निर्माण केल्या व त्या जोपासण्यासाठी विविष्ट विचारसरणीही अस्तित्त्वात आणल्या. साधू संतांचा देश म्हणून जरी आज भारताची ओळख असली तरी त्याच्या अंतरंगात जातीद्वेषांचे विष मुळापर्यंत भिनल्याचेच जाणवते. भारतात अनेक संत चळवळींनी सामाजिक सलोखा राखण्याचा जरी प्रयत्न केला असला तरी त्यांनी जातिभेदाविरूद्ध निकराने लढा दिल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्रातील अनेक संतांना तर त्यांच्या जातींच्या नावानेच ओळखल्या जात असल्याचे चित्र आहे. संत ज्ञानेश्वरांपासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्रातील संत चळवळीमधील अनेक संतांनी आपल्या रचनांमधून समाजातील विविध प्रश्नांना शब्दबद्ध केले आहे. हजारों वर्षांपासून शूद्रातिशूद्र समाज ह्या दलितपणाच्या अग्नित जळत आहे, परंतु एकूणच भारतीय साहित्याप्रमाणे संत साहित्यातही त्याविषयी फारशे लेखन आल्याचे जाणवत नाही. पंढरपूरच्या विठ्ठलाला प्रमाण मानून सात–साडेसातशे वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या महाराष्ट्रातील संत परंपरेत ज्यांनी कुणी आपल्या रचनांमधून ह्या जातीय, अस्पृश्य व धर्मांध प्रवृत्तींविरूद्ध आवाज उठविला त्यामध्ये संत चोखामेळा यांचे योगदान मोलाचे मानावे लागते.

**संत चोखामेळा यांची ओळख:**मध्ययुगीन काळात साधारणपणे तेराव्या–चौदाव्या शतकांत जातिभेद, धर्मांधता, अस्पृश्यता मोठ्या प्रमाणांत उफाळलेली दिसून



Scanned with CamScanner

येते. त्या काळातीस संत ज्ञानेश्वरांनाही वाळीत टाकल्यामुळे अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले होते. त्याच काळातील संत चोखामेळा हे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांचे समकालीन संत म्हणून ओळखले जातात. ''प्रा. देविदास इथापे यांच्या मते १४ जानेवारी १२६८, शके ११९० ही चोखोबांची जन्मतारीख आहे. चोखोबांच्या आईचे नाव सावित्रीबाई तर वडील सुदामा येसकर''घतेराव्या ते सतराव्या शतकापर्यंतच्या अनेक संतांनीही संत चोखामेळा यांची योग्यता व श्रेष्ठत्व मान्य केले आहे. पंढरपूरच्या दक्षिणेस चौदामैलांवर असलेल्या मंगळवेढे या गावचे रहिवासी असलेले संत चोखामेळा हे अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीत जन्माला आले होते. त्यांच्या पत्नीचे नाव सोयराबाई, मुलाचे नाव कर्ममेळा, धाकट्या बहिणीचे नाव निर्मळा तर मेहुण्याचे नाव बंका असे होते. ह्या सर्व संतांच्या रचनांमध्ये सामाजिक भान असल्याचे दिसून येते. ह्या सर्व संतांनी संत चोखामेळा यांना मार्गदर्शक व गुरूस्थानी मानले होते.''सध्या संत चोखामेळा यांचे ३५८, सोयराबाईचे ६२, कर्ममेळाचे २७, बंका याचे ४१ तर निर्मळाचे २४ अभंग उपलब्ध आहेत. चोखोबांच्या काळात त्यांचे संतसांगाती होते नामदेव, निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, जनाबाई, सोपानदेव, मुक्ताबाई, चांगदेव, गोरा कुंभार, जगमित्र नागा, सावतामाळी, नरहरी सोनार. या संतांच्या संगतीतच चोखोबांची प्रतिभा बहरली.''२ अशा विपूल रचना करणाऱ्या चोखोबांना अनेक चांगल्या संतांचा सहवासही लाभलेला दिसून येतो. आपल्या रचनांमधून सामाजिक भान राखणाऱ्या संत चोखामेळा यांचा मृत्यू मंगळवेढे येथे काम करताना गावकूस कोसळून इ. सन. १३३८ मध्ये झाल्याचे मानले जाते.

संत चोखामेळा यांच्या अभंगांतील विद्रोह: बाराव्या—तेराव्या शतकातही भारतीय समाजव्यवस्थेत शूद्र—अतिशूद्र लोक जातीपातीच्या, धर्मांधतेच्या, वर्णव्यवस्थेच्या वणव्यात होरपळून निघत होते. सर्वसामान्यांमध्ये कोणत्याही स्वरूपात जागृती होण्यास मार्ग नव्हता. या काळात भागवत धर्माचा जरी पाया रचला जात असला तरी समाजाच्या काळडोहात भेदभाव व हीनयातीभाव सामान्यांचे जगणे अस्वस्थ करीत होते. ''१३ व्या शतकात शूद्र—अतिशूद्र, गावगाडा, तेथले समाजजीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळख्यातून सुटले नव्हते. आध्यात्मिक लोकसाहीतील संत जसे पारमार्थिक होते तसेच ते प्रापंचिकही होते. चंद्रभागेतीरी मोकळा होणारा त्यांचा श्वास गावगाड्यतल्या शिवाशिवीच्या वातावरणात कोंडला जात होता. दैन्य, दारिद्र्य, वैफल्य यांनी लौकिक जीवनात ते गांगरले होते. देवाच्या दरबारात आणि संतांच्या सहवासात मानाचे स्थान असले तरी गावकीत त्यांची जागा वर्तुलाबाहेरचीच होती. भौतिक व्यवहारात वर्णव्यवस्थेसाठी त्यांची अवहेलना आणि उपेक्षा होतच होती.''३ गावगाड्यच्या रचनेत गावकुसाबाहेर जीवन जगणारा अस्पृश्य समाज अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत होता. संत चळवळीने त्यांच्या प्रत्यक्ष जगण्याला जरी बदलले नसले तरी अभंगांच्या माध्यमातून त्यांच्या मनातील विद्रोह शब्दबद्ध करण्याचा काही प्रमाणात प्रयत्न केला आहे. संत चोखामेळा यांच्या अभंगरचनांचे सूत्र भक्तिप्रवण असले तरी त्यांच्या रचनेत आंतरिक वेदना असल्याचे प्रकर्षाने जाणवते.धर्मशास्त्रांच्या विरोधात आपली प्रखर भूमिका मांडताना चोखामेळा आपल्या अभंगात म्हणतात की,

''कर्माते वाळिले धर्माते वाळिलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें।।
विधीतें वाळिले निषेधा गिळिलें । सर्व हारपलें जेथिचें तेथें ।।
वेदातें वाळिलें शास्त्रातें वाळिलें । सर्व हारपलें जेथिचे तेथें ।।
चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देहींच भेटला देव आम्हां ।।'' (पृ. क्र. १३२)

समाजातील उच्चजातीयांना वेदांचे, धर्मशास्त्रांचे पठण करण्याचा अधिकार आहे, परंतु आम्हाला मात्र तो अधिकार लाभला नाही. अशी तक्रार ते करीत असतानाच आपल्याला आपल्या अंतरातच देव भेटल्यामुळे वेदांचे पठण करण्याची आम्हा आवश्यकता नसल्याचा संदर्भ ते देतात. जातिभेदाचे मूळ किती वेदनादायी आहे, याचाच प्रत्यय या अभंगातून येतो. दलित, अस्पृश्य, शूद्रातिशूद्रांना विद्याग्रहणाचा अधिकार नसल्यामुळे ज्ञानापासून वंचित रहावे लागत होते, हे दुःख संत चोखामेळा आपल्या रचनेतून शब्दबद्ध



Scanned with CamScanner

करतात. पंडित पुरोहितांची चलती असलेल्या काळात आपल्या लेखनातून असा विद्रोह प्रकट करण्याचे धाडस त्यांनी दाखविले ही साधी बाब नाही.

विठ्ठलाला विळखा घालून बसलेल्या बडव्यांप्रतीचा भाव अभंगातून साकार करताना ते म्हणतात की,

'धांव घाली विठु आतां चालुं नको मंद ।
मज मारिती बडवे कांहीतरी अपराध ।।
विठोबाचा हार तुझ्या कंठी कैसा आला ।
शिव्या देऊनी मारा म्हणती देव कां बाटला'' (पृ. क्र. १३२)

एखाद्या मुलाने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची तक्रार आपल्या माय–बापाकडे करावी त्याप्रमाणे संत चोखामेळा यांनी होणाऱ्या आपल्या छळाची तक्रार विठ्ठलाकडे केली आहे. सात–आठशे वर्षांपूर्वीचे जातवास्तव त्यांनी आपल्या अभंगांतून बिनदिक्कत मांडल्याचे दिसून येते.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये पौराणिक ग्रंथ, होमहवन, डोईवर जटा अशा गोष्टींचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. त्याविरोधात कठोर भूमिका घेताना संत चोखामेळा म्हणतात की,

'धिक् तो आचार धिक् तो विचार । धिक् तो संसार धिक् जन्म ।।
धिक् ते पठण धिक ते पुराण । धिक् यज्ञ हवन केलें तेणें ।।
धिक् ब्रह्मज्ञान वाउग्या ह्या गोष्टी । दयाक्षमा पोटी शांती नाही ।।
धिक् तें आसन जटाभार माथा । वायांचि हे कंथा धरिली जेणें ।।
चोखा म्हणे धिक् जन्मला तो नर । भोगी नरक घोर अंतकाळी ।।'' (पृ. क्र. १५६)

तेराव्या शतकातील धर्मांधतेविरूद्धचा संत चोखामेळा यांचा हा उद्‌गार निश्चितच विद्रोही स्वरूपाचा असल्याचे दिसून येते. शूद्र, अतिशूद्रांना अज्ञानात खितपत ठेवणारा हा समाज स्वत: रूढिवादाच्या किती घोर अंध:कारात बुडालेला होता, हे सप्रमाण दाखविण्याचे कार्य संत चोखामेळा यांनी केले आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात विटाळ पाळणारे लोक दिसून येतात. दलित अस्पृश्यांचा स्पर्शही विटाळ मानल्या जात असे, सार्वजनिक पाणवठ्यावर दलितांना पाणी भरण्यास मनाई होती, त्यांना मंदिर प्रवेश नाकारला गेला होता. हजारों वर्षांपासून इथल्या सनातनी व्यवस्थेने पाळलेल्या ह्या कुप्रथेविरूद्धचा विद्रोह आपल्या शब्दांतून प्रकट करताना संत चोखामेळा म्हणतात की,

''वेदासी विटाळ शास्त्रासी विटाळ । पुराणें अमंगळ विटाळाची ।।
जीवासी विटाळ शिवासी विटाळ । काया अमंगळ विटाळाची ।।
ब्रह्मिया विटाळ विष्णूसी विटाळ । शंकरा विटाळ अमंगळ ।।
जन्मता विटाळ मरतां विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदिअंती ।।'' (पृ. क्र. १६६)

संत चोखामेळांची विटाळासंदर्भातील टीका प्रस्थापितांना खडे बोल सुनावणारी आहे. अंगावर पडलेल्या सावलीलाही विटाळ माणून स्वत:चे शुद्धिकरण करणाऱ्या व्यवस्थेला त्यांनी धारेवर धरल्याचे दिसून येते. हा विटाळ किंवा ही अस्पृश्यता समाजमनाच्या तळाशी भिनलेली होती. ''विठ्ठलभक्त चोखोबांना पुजाऱ्यांकडून, बडव्यांकडून व ब्राह्मणांकडून फार छळ सोसावा लागला. चोखोबा हे ज्ञानदेव–नामदेव आदि संतांच्या मेळाव्यात होते. कीर्तनात त्यांना संतमंडळीत स्थान मिळे. तथापि देवाच्या देवळात प्रवेश करण्याचा आणि देवाचे दर्शन जवळून घेण्याचा त्यांना अधिकार नव्हता. ही खंत चोखोबांच्या मनाला लागून राहायची. चंद्रभागेच्या तीरी वाळवंटात वातावरण मुक्त तथापि देवळात गावात उच्च–नीचतेचा, वर्णव्यवस्थेचा विळखा कायम अशी स्थिती असायची. ज्ञानदेव–नामदेव आदी संतांच्या सहवासात चोखोबांना वाळवंटात मानाचे स्थान तथापि देवळात मात्र मज्जाव''४ अशा अस्पृश्यतेच्या छायेत जीवन जगलेल्या संत चोखामेळा यांच्या अभंगात म्हणूनच व्यवस्थेविषयीची चीड दिसून येते. शब्दांच्या माध्यमातून त्यांनी त्याकाळातील ज्वलंत समाजवास्तव मांडले आहे.

संत चोखामेळा यांच्या समग्र अभंगातूनच आंतरिक वेदनेची प्रकट झाल्याचे दिसून येते. पंढरपूरच्या विठ्ठलाला प्रमाण माणून त्यांनी केलेल्या रचनांच्या



Scanned with CamScanner

मागे त्यांचे दु:ख, त्यांची वेदना, मनातील अस्पृश्यतेविषयीची चीड, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेविषयीचा राग दिसून येतो, त्याचबरोबर प्रस्थापितांना त्यांनी ज्ञानाची खरी परिभाषाही समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपले सर्वकाही विठ्ठल आहे, हे जाणूनच संत चोखामेळा यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे, तसेच आपल्या मनातील विठ्ठलाप्रतीचा भक्तीभाव खरा असल्याचेही सोदाहरण सांगितले आहे, ते म्हणतात की,

''ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।
नदी डोंगी परी जळ नोहे डोंगे । काय भुललासी वरलीया रंगा ।।
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।''(पृ. क्र. १६१)

आपल्यालाही भक्ती करण्याचा अधिकार आहे, आपली भक्तीही खरी आहे, हेच सांगण्याचा प्रयत्न संत चोखामेळा यांनी केला आहे. केवळ जात लक्षात घेऊन चालत नाही तर मानवतेच्या दृष्टिनेही विचार केला पाहिजे ही शिकवणच ते आपल्या अभंगातून देतात. संत चोखामेळा यांच्या कुटूंबातील सोयराबाई, कर्ममेळा, निर्मला, बंका ह्या सर्वांच्या अभंगरचनांमधूनही असेच प्रखर विचार आल्याचे दिसून येते. संत चोखामेळा यांच्या मनातील वेदना शब्दांच्या माध्यमातून विद्रोह होऊन बाहेर पडलेली दिसून येते. भारतीय स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या दलित चळवळीच्या मुळाशीसुद्धा संत चोखामेळा यांच्या अभंगातील विद्रोहीपण असल्याचे दिसून येते. आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जातियता, अस्पृश्यतेविरूद्धचे आजच्या काळातील महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य म्हणूनच उल्लेखनीय असल्याचे दिसून येते. संत चोखामेळा यांची आंतरिक वेदनाच दलित, आंबेडकरवादी चळवळीच्या मुळाशी असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष:**

संत चोखामेळा यांच्या अभंगातील विद्रोह आंतरिक स्वरूपाचा असला तरी त्याच्यातील धीटभाव वाखाणण्याजोगा आहे.

भारतीय समाजव्यवस्थेतील जातियतेवर, अस्पृश्यतेवर त्यांनी प्रखर भाष्य केले आहे.

विठ्ठलाला प्रमाण माणून त्यांनी आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडली आहे, त्यामधून समाजवास्तव अधोरेखित झाले आहे.

आजच्या दलित, आंबेडकरवादी साहित्याच्या मुळाशी असलेली विद्रोही जाणिव संत चोखामेळा यांच्या अभंगाचा वसा घेऊन वाटचाल करीत असल्याचे जाणवते.

संत चोखामेळा यांचे अभंग समाजातील विषमतावादी वास्तव अधोरेखित करतानाच समता, मानवता, बंधुता, मूल्यभाव ह्या मानवी मूल्यांची जपणूक करणारे असल्याचे निश्चितपणे जाणवते.

**आधारग्रंथ:**

१. कदम, स. भा. (संपा.), श्री संत चोखामेळा चरित्र आणि अभंग, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९९ (प्र. आ. )

**संदर्भग्रंथ:**

१. परब सचिन, गायकवाड श्रीरंग, जोहार चोखोबा, नाग–नालंदा प्रकाशन, सांगली, १४ नोव्हेंबर २०१६ (प्र. आ. ), पृ. क्र. ११

२. तत्रैव, पृ. क्र. ११

३. खरात शंकरराव, चोखोबाचा विद्रोह, सुगावा प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल २००२ (प्र. आ.), पृ. क्र. ८, ९

४. पाटील, अनंतराव, ज्ञानोबा ते तुकोबा, अनमोल प्रकाशन, पुणे २, १९९२ (प्र. आ.), पृ. क्र. ५६

❑❑❑



Scanned with CamScanner